ब्राह्मणसभेचे सभागृह पुढें मिळूं न शकल्यामुळें बाराव्या अध्यायावरील उर्वरित प्रवचनें श्री फडके गणपति मंदिर विठ्ठलभाई पटेल पथ येथें पुरीं झालीं. या प्रवचनांच्या अखेरी अखेरीस श्रोत्यांची इच्छा असल्यास सर्व ज्ञानेश्वरी सांगण्याची मनीषा स्वामीजींनी दर्शविली व त्यानुसार सन १९४३ ते १९४६ या चार वर्षांत येणाऱ्या संनाशांच्या चातुर्मास्यांत ( आषाढ शु. १५ ते भाद्रपद शु. १५ ) अशा एकंदर आठ महिन्यांमध्यें, ' ॐ नमोजी आद्या ' पासून ' श्री सच्चितानंदबाबा आदरें। लेखकु जाहला ' पर्यंत साद्यंत ज्ञानेश्वरी संप्रदायपूर्वक ऐकावयास मिळाली.

हीं चार चातुर्मास्य प्रवचनें आंग्रेवाडींतील ( सध्यांचें टिळकनगर ) श्रीमंत प्रिन्सिपाल जगन्नाथ रघुनाथ तथा नानासाहेब घारपुरे यांच्या निवासस्थानीं झालीं. हें ठिकाण निवडण्याचें कारण असें कीं स्वामीजींच्या भगिनी श्री नानासाहेबांच्या सापत्न मातोश्री होत्या. त्या ब्रह्मीभूत श्री नानामहाराजसाखरे यांच्या कन्या असल्यामुळें साहजिकच ज्ञानेश्वरी-निष्ठ होत्या. त्यांनीं ज्या ठिकाणीं ज्ञानेश्वरीचीं अनेक पारायणें केलीं व देह ठेविला त्या ठिकाणीं भगिनींचें पुण्यस्मरण म्हणून सर्व ज्ञानेश्वरी एकदां सांगण्याची स्वामीजींची मनीषा होती.

श्री नानामहाराज साखरे यांचा मठ पुण्यांत आहे. सन १९३१ पर्यंतचें आयुष्य पुण्यांत गेलें असून सुद्धां नुसत्या ऐकींव माहितीच्या पलीकडे प्रत्यक्ष मठ पाहावा अशी बुद्धि झाली नाहीं हा योगायोग आहे. वरीलप्रमाणें १९४२ मध्यें स्वामीजींशीं जो संबंध आला तो त्यांच्या समाधिकालापर्यंत अखंड होता. ( जानेवारी १९५४ )

वरील सांप्रदायिक श्रवणामुळें ज्ञानेश्वरी वाचनाची नवीन दृष्टि प्राप्त झाली. पुष्कळशा शंकास्थळांचे निरसन झालें व कांहीं शब्दांच्या स्वतः लावलेल्या अर्थ विषयक चुका दुरुस्त करतां आल्या. या चार वर्षांत ज्ञानेश्वर जयंती सप्ताहाच्या निमित्तानें श्रावण व॥ १ ते वद्य ८ पर्यंत पारायणें झालीं. हा परिपाठ अजून चालू आहे. आणखीहि कांहीं नैमित्तिक पारायणें झालीं. एक पारायण एका दिवसांत श्री तालीम शिल्पकार यांच्या अभ्यासनिकेत झालें. यास १४ तास लागले.

स्वामीजींच्या प्रासादिक मार्गदर्शनामुळें ज्ञानेश्वरी वाचनाची नवी दृष्टि प्राप्त झाली. ज्ञानेश्वरी एका विशिष्ट रीतीनें वाचल्यास श्रोत्यांस प्रथम श्रवणानेंहीं कांहीं अंशीं अर्थबोध होतो असें अनुभवास आलें.

ज्ञानेश्वरी एका जन्माच्या अभ्यासानें पूर्णांशानें समजण्यासारखी नाहीं. ज्या महात्म्यास समजली त्याचें पूर्वपुण्य फलद्रूप आलें असेंच म्हणावें लागेल. परंतु प्रत्येक नवीन वाचनाच्यावेळीं मागीलपेक्षां नवीन कांहींतरी समजलें असा आजतागायत अनुभव आहे. कारण गीताज्ञानेश्वरीचें माहात्म्यच तसें असाधारण आहे. ज्ञानेश्वरांच्याच शब्दांत, अठराव्या अध्यायांत गीतामाहात्म्याचें वर्णन करतांना ते म्हणतात :—

तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभु विवरी ।
जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारौनि ॥ ( ज्ञा. १–७० )

तेथ हरु म्हणे नेणिजे । देवि जैसें कां स्वरूप तुझें ।
तैसें हें नित्यनूतन । देखिजे । गीतातत्व ॥ ( ज्ञा. २–७१ )

हें वर्णन ज्ञानेश्वरीसही तंतोतंत लागूं पडतें हें अनुभवांतीं कळेल. ज्ञानेश्वरांनींहि ग्रंथ समाप्तीच्या भागांत फलश्रुति सांगतेवेळीं :—

तैसें अध्यात्मशास्त्रीं इयें । अंतरंगचि अधिकारियें ।
परीलोकु वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ ( ज्ञा. १८–१७४९ )

असा सर्व वाचकांस सामुदायिक आशीर्वाद दिला आहे; आणि गीतेजवळ पाठक किंवा अर्थज्ञ असा भेदभाव नाहीं, गीतेजवळ उपासकास देण्यास मोक्षापेक्षां अलीकडचें कांहीं नाहीं ( ज्ञा. १८–१६९४ ), म्हणून ज्ञानेश्वरीचें ' सार्थ ' वा ' निरर्थ ' ही वाचन कदापि वायां जाणार नाहीं अशी मुमुक्षु वाचकानें श्रद्धा बाळगावी.

या चर्चेचा उद्देश स्वानुभवकथन हा आहे. हेतु असा कीं, मार्ग व त्या मार्गाचे अधिकारी अनंत व विविध आहेत आणि कोणास हा मार्ग ग्राह्य वाटल्यास त्यानें तो स्वीकारावा.

गेल्या सुमारें पाव शतकापासून बुद्धिजीवी व बुद्धिवादि मध्यमवर्गाचें लक्ष ज्ञानेश्वरीच्या वाचनाकडे व अभ्यासाकडे लागत आहे हें सुचिन्ह आहे. या परिवर्तनास मागील पिढींतील प्रा. नानामहाराज साखरे व चालू पिढींतील प्रा. सोनोपंत दांडेकर, प्रा. न. र. फाटक वगैरेंचे परिश्रम कारणीभूत आहेत. या सर्वांचीच दृष्टि सांप्रदायिक आहे असें नाहीं. वैयक्तिक वा विभागीय गरजेनुसार ज्ञानेश्वरीच्या अध्ययन अध्यापनाच्या पद्धतींत फरक दिसून येतो. उदाहरणार्थ वारकरी शिक्षणसंस्थेंत शिकविली जाणारी ज्ञानेश्वरी व मुंबईतील एखाद्या प्राध्यापकानें परीक्षेंत उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीनें छात्रांस शिकविलेली ज्ञानेश्वरी यांत महदंतर असणें स्वाभाविक आहे; परंतु, ' अंगा वरि फोडावया लागीं । लोहो मिळो कां परिसाचें अंगीं । कां जे मिळतिये प्रसंगीं । सोनेंचि होईल ॥ ( ज्ञा. ९-४६४ ) या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणें कोणत्याहि निमित्तानें कां होईना, ज्ञानेश्वरीशीं जास्तींत जास्त संबंध येत आहे हीहि गोष्ट कमी महत्त्वाची नाहीं.

ज्ञानेश्वरी हा वारकरी पंथाचा वेद आहे असें सार्थपणें म्हटलें जातें व हा ग्रंथ अहर्निश जवळ बाळगण्याची प्रथा आहे असें जाणकारांकडून सांगण्यांत व प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीसहि येतें. मुद्रणकला त्या मानानें अगदीं अर्वाचीन असल्यामुळें वाङ्मय संरक्षणाच्या परंपरेनें हस्तलिखितें करून जतन करण्याचा महत्त्वाचा उपाय होता. यास उद्देशूनच ज्ञानेश्वरांनीं गीता–ज्ञानेश्वरी पठण व लिहून बरोबर बाळगणें यासाठीं ज्ञानेश्वरीच्या फलश्रुतींत आशीर्वाद दिला आहे. ' ये गीतेचा पाठु जो जाणे । तयाचें नि

सांगातीपणें । गीता लिहोनि वाहणें । पुस्तकमिषें ॥ (ज्ञा. १८–१४६१). ज्ञानेश्वरी अहर्निश जवळ बाळगण्याचें मूळ या वचनांत असावें असें वाटतें.

**मनोगत**

या व या आधींच्या चार लेखांकांतून ज्ञानेश्वरीविषयक मनांत घोळत असलेले कांहीं व तात्कालिकतेनें उत्स्फूर्त झालेलेहि कांहीं विचार जसे जमले तसे 'ठसें ठोंकसें' शब्दांत मांडले. प्रसिद्धिसाठीं म्हणून लेखन प्रयत्न वा धाडस करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. प्रांजलपणें मी 'लेखक' त्या शब्दाच्या गृहीतार्थानें नाहीं. वस्तुतः कांहीं वर्षांपूर्वी केलेला एक प्रयत्न एका मासिकाकडून साभार परत केला गेला होता. असें असतांहि, माझ्या एका निष्ठावान् व प्रेमळ मित्राच्या आग्रहानें व प्रोत्साहनानें सदर प्रयत्न केला, व 'श्री साईलीला' संपादकांच्या सौजन्यानें हा प्रयत्न प्रकाशांत आला. त्याबद्दल मी आभारी आहे. यानंतर संधि मिळेल त्याप्रमाणें व ज्ञानेश्वर बुद्धि देतील त्याप्रमाणें ज्ञानेश्वरीच्या असंख्य पैलूंपैकीं यथाबुद्धिगम्य अंशांवरचे विचार प्रदर्शित करण्याचा मानस आहे. ही सेवा 'साईलीले'च्या वाचकवर्गानें गोड मानून घ्यावी हीच विनंति.


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 — *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

(स्थापना १९३४) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान)

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

लेo : एक साईभक्त



## अध्याय तिसरा
## ( उत्तरार्ध )

तो गुरुपौर्णिमेचा दिवस होता. गुरुपूजनासाठीं भक्तगण जमलेला होता. अण्णांनी ( चिंचणीकर ) बाबांस स्वयंस्फूर्तीनें विनंती केली. आणि त्यांनीं जी शिफारस केली ती ऐका. अण्णास ( चिंचणीकर ) माझी मोठी काळजी. त्यांनीं बाबापुढें करुणा भाकिली कीं, यांचा ( लेखकाचा ) वाढता संसार आहे. तरी त्यांच्यावर आपली कृपा-दृष्टि असावी. त्यांना पेन्शन मिळतें; परंतु तें संसारास पुरण्यासारखें नाहीं. त्यांना कांहीं तरी दुसरी नोकरी लावा व त्यांची काळजी दूर करा. त्यावर बाबा म्हणाले, नोकरीचें काय ? त्यांना नोकरी मिळेल कीं. आतां त्यांनीं माझी चाकरी करावी. त्यामुळें त्यांना सुख मिळेल. याचीं ताटें सदासर्वदा भरलेलीं रहातील. त्यांच्या जिवांत जीव असेपर्यंत तीं कधींही रिकामी रहाणार नाहींत. त्यांनीं माझ्याठायीं भक्तिभाव ठेवावा म्हणजे त्यांचीं सर्व संकटें नाहींशीं होतील. ज्यानीं धर्माचरण सोडलें व जे कांहीं तरी केलें कांहीं तरी झालें, असें समजून वागतात ते चळले आहेत म्हणून समजावें. त्यांच्यापासून चार पावलें दूर रहावें, त्यांना महाभयंकर समजून ते समोर आले तर आपण बाजूला सरावें. त्यांची सावलीही घेऊं नये. सावली पडली तरी दुःख भोगावें लागेल असें समजावें. ज्यानें आचारविचार सोडले, जो शीलभ्रष्ट झाला, ज्याला विचार नाहीं, जो कर्मनष्ट व ज्याला इष्ट अनिष्ट समजत नाहीं त्याचें कल्याण कसें बरें होईल ?

कोणत्याही प्रकारचा लागाबांधा असल्याशिवाय आपल्याजवळ कोणीही येत नाहीं. मग तो कुत्रा असो, डुकर असो कीं यःकश्चित् माशी असो. यासाठीं कुणालाही हडहड करूं नये. यापुढें यांनीं भक्तिभावानें माझी सेवा करावी. त्यामुळें देवाधिदेवाला करुणा येईल व याला अक्षय सुख लाभेल.

' मग ही पूजा कशी करावी, मी कोण, कसा आहे हें निश्चयानें यानें कसें ओळखावें, हा माझा देहविनाशी आहे, परंतु या देहाच्या पलीकडे जो मी अविनाशी सुपूज्य ब्रह्म आहे; त्याची पूजा करावी. मी तो अष्टधी प्रकृतिरूपानें सर्वत्र भरलेला आहे असेंच भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीतेंत सांगितलें आहे. या जगांत जी नानारूपें प्रकृत्या, आकृत्या दिसतात, तसेंच ज्या स्थावर जंगमादि अनंत दिसत

आहेत, त्या सर्वांमध्यें मीच अष्टधाप्रकृतिरूपानें नटलेला आहें. हा सारा माझाच चमत्कार आहे. ॐ प्रणव हा माझें जरी ज्ञान करून देणारा असला तरी, त्याचें ज्ञान करून देणारा मीच असून या विश्वामध्यें ज्या अनेक वस्तू आहेत त्या सर्वांमध्येंही मी एकटाच आत्म्याच्या रूपानें सर्वांत वास करीत आहें. मी दाही दिशा व्यापुन राहिलों आहे. मग इच्छा कसली बाळगायची ? मी व माझेपणा जेथें राहिला नाहीं तेथें इच्छा कसली असणारच नाहीं. सर्वांत वसलेला मी आहे. कामनेचा उदय बुद्धीमुळें होत असतो. आत्म्याशीं तिचा कांहीं संबंध नाहीं. मीच निजात्ममूर्ति असल्यामुळे तेथें कामना कशी उत्पन्न होणार ? वासना अनेक प्रकारची असते. मी कोण ह्याचें खरें ज्ञान झालें म्हणजे जशा गारा सूर्याच्या तापलेल्या उन्हांत नाहींशा होतात तशी ती अंतर्धान पावते. मन, बुद्धी वगैरे इंद्रियांसकट जरी मी असलों तरी मी स्थूल नव्हे, विराट नव्हे, व अप्रकट हिरण्यगर्भही नाहीं. मी जुनाट अनादि साक्षीरूप आहें. मी इंद्रियगणांच्या पलीकडचा आहे. विषयगोडी मला नाहीं. माझ्याशिवाय रीतें असें स्थूल कांहींच नसलें तरी कर्ता करविता मी नाहीं. मी सर्वांपासून अलिप्त आहे. मनबुद्धि इत्यादि इंद्रियें व त्यांचे परिणाम जड आहेत अशी ओळख पटली म्हणजे विरक्तीचा जन्म होतो. व ज्ञानावरचें आवरण दूर होईल. स्वरूपाचें विस्मरण झालें कीं, तेथें मायेचा पसारा दिसूं लागतो. शुद्ध पूर्णानंदाचें स्मरण तोच मी चैतन्यघनरूप आहें. अशा त्या मजकडे सर्व वृत्ति वळविणें तीच माझी सेवा, तीच माझी भक्ति. मी चिदानंदस्वरूप आहे याची प्रतीति येणें म्हणजे 'ज्ञान' प्राप्ति होय. मीच आत्मा, मीच ब्रह्म, मीच प्रज्ञान, आनंद. जग हें मिथ्या आहे, हा केवळ भ्रम आहे; खरोखर ब्रह्म तें मीच आहे.

मी नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त व वासुदेव आहें. माझें खऱ्या भक्तिभावानें व श्रद्धेनें पूजन करणाऱ्याचें कल्याणच होईल. असा मी कोण तें समजून घेऊन माझें यथार्थ पूजन करावें व मला अनन्यभावानें शरण येऊन मजमध्यें पूर्णपणें समरस व्हावें. नदी समुद्राला शरण गेली असतां ती पुन्हां परतून येते का ? महासागराला तिनें आलिंगन दिलें म्हणजे तिचें नदीपण उरत नाहीं. तुपांत भिजलेल्या कापसाच्या वाती पेटल्या म्हणजे जशा स्वतःच प्रकाशित होतात त्याचप्रमाणें संतांना शरण गेल्यास आपण संतरूप होतो. चैतन्यघन अल्लामालीक याच्याशिवाय चित्ताला दुसरें चिंतन नाहीं व नेहमीं शांततापूर्वक निरपेक्ष समदर्शन घेत असलें म्हणजे तेथें 'मीपणा' उरणारच कोठें ! निर्ममत्व, निरहंकृति, निर्द्वंद्वत्व व निष्परिग्रहस्थिति हे चार गुण जेथें आढळून येतात तेथें मीपण असणें शक्य नाहीं. सारांश हे आठही गुण आंगीं पूर्णपणें बाणले असतां मीपणाला तेथें स्थान कसें असणार ! ज्याचें मीपण सर्वांविषयीं भरलें आहे, माझें मीपणहि त्याचाच अंश आहे. तें सर्व माझ्याच पदीं समर्पण करणें हीच माझी सेवा. हेंच माझें भजन व जो अशा रीतीनें अनन्यपणें मला शरण आला तो मद्रूप झाला आहे असें जाणा. मामकांत हेंच भगवत्वचन आहे. कीटक भ्रमरासवें भ्रमराचें ध्यान करीत असतां तो

शेवटीं भ्रमर होऊन जातो; त्याचप्रमाणें शिष्य आपल्या गुरूचें भजन करीत असतां गुरुसमान होतो. समान शब्दाचें वेगळेपणहि गुरूला एक क्षणहि सहन होत नाहीं. शिष्याशिवाय गुरुत्व नाहीं. तसेंच शिष्यत्वापासून गुरुपण निराळें नाहीं. असो. ज्यांची पूजा करण्याची आज्ञा झाली व 'मी कोण' याची व्याख्याहि झाली. याच्या पुष्टीकरणार्थ ओघानें एक कथा आठवत आहे ती मी आतां सांगतों.

शिरडीस एक रोहीला आला. बाबांच्या गुणावर तो मोहीत होऊन त्याची सेवा तो प्रेमानें करूं लागला. पुष्कळ दिवस तो तेथें राहिला. तो शरीरानें पुष्ट असून माजलेल्या रेड्यासारखा होता. तो स्वैरवर्तनी असून कोणालाहि मानीत नसे. अंगांत फक्त एक पायघोळ कफनी घालून तो मशिदींत येऊन राहिला होता. दिवस असो किंवा रात्र असो; मशिदींत किंवा चावडींत तो मोठ्या आवाजांत आवेशानें मूर्खासारखा कलमे पडत असे. महाराज तर शांतीच पुतळे! त्यांनीं अहोरात्र होणाऱ्या या पढण्याचा त्रास मानला नाहीं. गांवचे लोक मात्र कंटाळले. मध्यरात्रींलाहि चालणाऱ्या त्या रोहिल्याच्या सारख्या टकळीमुळे त्यांची झोपमोड होऊं लागली. सर्व दिवसभर उन्हां-तान्हांत व रानावनांत खपावें आणि रात्रीं निवांत झोंप नाहीं म्हणून अखेर लोक कंटाळले. बाबाना या टकळीचा कांहीं ताप होत नसेल. लोकांचें पाप उभें राहिलें. रात्रीं सुखाची झोप मिळत नाहीं म्हणून त्यांना रोहिल्याचा अतिशय संताप आला. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची स्थिति झाली. कोठपर्यंत त्यांनीं धीर धरावयाचा? रात्रंदिवस ही कटकट. ते मोठ्या फिकीरींत पडले. रोहिला अगोदरच माथेफिरू त्यांत त्याला बाबांचा आधार; तो अतिशय अनावर झाला व बेफाम होऊन लोकांना वाटेल तसें बोलूं लागला. सर्व गांव त्याच्यावर उलटला. दयाघन साई माऊलीनें त्याला आपल्या पाठीशीं घातलें. लोक काकुळतीनें बाबांच्याकडे आले. बाबानीं त्यांच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. उलट बाबा त्यांना म्हणतात, 'त्या रोहिल्याला सतावूं नका. मला तो फार आवडतो. त्याची बायको घरघुशी असून त्याच्या बरोबर ती नांदूं इच्छित नाहीं. त्याला चुकवून ती माझ्याकडे यावयाला पहात आहे. त्या रांडेला कांहीं लाज लज्जा नाहीं. मोठ्या प्रयत्नानें ती माझ्या घरांत घुसायला बघते. ओरडावयाचें थांबलें की संधी साधून ती दुर्बुद्धि घरांत शिरू पाहिल. तो ओरडावयास लागला म्हणजे ती पळून जाते. त्यामुळें मला सुख वाटतें. कोणी त्याच्या वाटेस जाऊं नका. ओरडूं द्या त्याला मुक्तकंठानें. त्याच्या शिवाय माझी रात्र जात नाहीं. त्याच्यामुळें मला सुख आहे. चालूं द्या त्याची टकळी! कंठशोष करूं द्या त्याला. त्यांतच माझं हित होत आहे, नाहींतर ती दुष्ट रोहिली मला त्रास देईल. तो ओरडून थकला म्हणजे आपोआपच थांबेल. तुमचेंही काम होईल आणि ती रांड माझ्याशी लगट करणार नाहीं." असें बाबांनीं म्हणतांच इलाजच खुंटला. बाबांच्या मनांत कांहीं गोंधळ नाहीं मग आम्हाला त्याची खंत कशाला? आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुनमास. रोहिल्यानें मोठ्या आवाजांत कलमे पढून कहर मांडिला, सर्व लोक आश्चर्यचकित झाले.

बाबा किती क्षमाशील! ज्या ओरडीनें मस्तकाच्या चिंधड्या उडून जाव्या, त्यांत बाबा तल्लीन होते. किती भयंकर ओरडायचा तो! त्या रोहिल्याच्या घशाला कोरड पडत नव्हती, याचेंच आश्चर्य! पण बाबांचा एकच आग्रह कीं त्याला दरडावूं नका. रोहिला दिसायला जरी वेडापीर असला तरी बाबांबद्दल त्याला मोठा आदर. त्याच्या धर्माप्रमाणें मोठ्या आनंदानें तो कलमे पठण करीत असे. वाणी मंजुळ किंवा कर्कश आहे, याबद्दल कांहींच विचार नाहीं. एकदम स्वयंस्फूर्तानें हरीनाम गर्जत तो उठत असे. मूळचाच घोगरा आवाज व त्या आवाजांत मोठ्या आनंदानें तो 'अल्ला हो अकबर' नामाचा गजर सारखा करीत असे.

ज्याला हरिनामाचा कंटाळा त्याचा विटाळ होईल म्हणून बाबा फार भीत असत. मग ज्याला भजनाचा चाळा त्या रोहिल्याला उगाच कां पिटाळून लावा. 'मद्भक्ता यत्र गायंति' तेथें मी नेहमीं उभा असतों हें भगवंतांचें वचन खरें करावयास बाबांनीं ही प्रतीति दाखविली. मिळेल तें ओलें कोरडें मागून खावें, नाहीं तर उपाशींच रहावें अशी रोहिल्याची स्थिति असतांना त्याला बायको कोठून आली व ती बाबांकडे जाणार कशी? रोहिला कफल्लक. मग त्याचें लग्न कोठलें व बायको कोठली? बाबा तर बाल-ब्रह्मचारी. सर्व गोष्टच मुळांत काल्पनिक होती. तो कंठशोष करीना का. बाबांना त्याच्या कलम्यांचा आनंद. ते कलमे ऐकत राहतील, कोठें कलम्यांची उद्बोधकवाणी आणि कोठें तीं लोकांचीं पोकळ गाऱ्हाणीं यांतील फरक दाखविण्यासाठींच बाबांनीं ही बतावणी केली, रोहिल्याला ईशनामाबद्दल आवडी आहे म्हणून मला त्याची संगती प्रिय आहे याची बाबानीं लोकांना प्रचिति दाखविली. दृश्य, द्रष्टा आणि दर्शन हीं सगळींच ज्याला देवाप्रमाणें आहेत, मग तो ब्राह्मण असो वा म्लेंच्छ असो, दोघेही त्यांना सारखेच.

एकदां दुपारची आरती झाली. मंडळी परत स्वस्थानीं जावयास निघाली; त्यावेळीं बाबांच्या तोंडून जीं मधुर वचनें निघालीं तीं श्रोतेहो, ऐका.

'तुम्ही कुठेंही असा, कांहीं करा, पण एवढें लक्षांत असूं द्या, कीं तुमच्या सर्व कृत्यांची बातमी मला ताबडतोब लागते. असा जो मी अदृश्य, तो मी सर्वांच्या अंतर्यामी असून मी सर्व जाणणारा आहें व मी सर्वभूतांचा स्वामी आहें. मी सर्व भूतांच्या आंतून बाहेरून आहें; इतकेंच नव्हे तर या विश्वांत चराचरांतही मी भरून उरलों आहे, व या सर्वांचा सूत्रधारही मीच आहे. या सगळ्या प्राणिमात्रांची मी माता आहे, त्रिगुणांची साम्यावस्था व सकल इंद्रियांचा निर्माता मीच आहे. सर्वांचें उत्पादन करणारा, संहारक पण मीच. ज्याचें माझ्याकडे नेहमीं लक्ष असतें, त्याच्यावर संकटें येत नाहींत. परंतु एकदां कां त्याला माझा विसर पडला कीं मायेच्या जंजाळांत तो गुरफटून जातो. हें दृष्टीस पडणारें माझें स्वरूप म्हणजे माझा हा देह, तसेंच कीड, मुंगी, राजा व रंक तसेंच अनूप असें हें चराचर विश्व हीं सारीं माझींच रूपें होत हें लक्षांत ठेव.'

किती मौजेचा हा इषारा बाबांनीं दिला. संतांमध्यें आणि ईश्वरांत फरक नाहीं. विश्वोद्धाराकरितां ते अवतार घेऊन चराचरांत अभेदरूपानें असतात. गुरुपदीं लीन

व्हायचें असेल तर गुरुगुण गायन व कथाकीर्तन करावें व त्यांचें भक्तीनें श्रवण करावें. साधकानें अशारीतीनें श्रवण करावें कीं, सांगणारा व ऐकणारा हे दोघेहि एकमेकांत समरस होऊन जावेत. तेणेंकरून चैतन्यघन प्रकटेल व मनाला उन्मनी स्थिती प्राप्त होईल. संसारांत गर्क असतांना जर कांहींएक प्रयत्न न करतां एखादी संतकथा क्षणभर कानावर पडली म्हणजे ती साहजिकच आपलें कल्याण करूं शकते. तर मग आपल्या हिताकरितां या कथा मोठ्या भक्तिभावानें ऐकल्या त्या आपणास किती पुण्यदायक ठरतील याचा श्रोत्यांनीं विचार करावा. येणेंप्रमाणें गुरुपदीं प्रेम जडेल व क्रमाक्रमानें आपणांस वाढतें सुख लाभेल. दुसऱ्या निष्ठा, नियमांची आवश्यकता नाहीं. व यांतच आपलें परमकल्याण होईल. अशा रीतीनें मनाला निर्बंध घातला असतां आपला कथाश्रवण छंद वाढेल. आपली विषयापासून निवृत्ति होईल व आपणास परमानंद लाभेल.

अशी बाबांची मधुर वाणी ऐकून यापुढें नरसेवेच्याऐवजीं गुरुसेवा करावयाची असा मी मनांत निश्चय केला. 'मिळेल मेली तया नोकरी' असें बाबांनीं म्हटलें होतें, यांचें प्रत्यंतर मिळणार कीं काय म्हणून मनाला सारखी हुरहूर लागली. बाबांचा शब्द खाली पडेल असें होणार तर नाहीं, अशा तऱ्हेनें माणसांची सेवा करावी लागणार. त्यामुळें मोठें हित साधेल असें नाहीं. स्वयंस्फूर्तीनें अण्णांनीं विचारलें खरें, तथापि माझी पण इच्छा नव्हती असें नाहीं. अनिच्छा ही प्रारब्ध भोगेच्छा नव्हे. मला नोकरी लागून माझ्या संसारनिर्वाहाची सोय व्हावी. श्रीसाईंनीं गूळ दाखविला पण उपदेशामृतरूपी औषध पाजलें. या गुळाच्या आशेनें भाग्यवश तें औषध पिऊन समाधान पावलों. अकल्पित रीतीनें नोकरी मिळाली व द्रव्याच्या आशेनें ती मी स्वीकारली. गूळ गोड असला तरी खातां खातां शेवटीं त्याचा वीट येणारच; पण बाबांच्या उपदेशमधाचें बोट चाखतां चाखतां तें चोखट वाटलें. नोकरी कायमची नव्हती. आली तशी गेली आणि बाबांनीं सहजासहजीं चिरसौख्य भोगावयास मला जागच्याजागीं बसवून घेतलें. (अपूर्ण)

---

## अल्ला सर्वव्यापी आहे

गुरु नानक हे सर्व धर्मांचा व धर्मियांचा सारखाच आदर बाळगणारे होते. ते एकदां मक्केला गेले असतां 'काबा' ह्या पवित्र स्थळाकडे आपले पाय करून झोंपले होते. तेथील एका मुल्लानें हें पहातांच त्याला चीड आली. तो नानकला हालवून म्हणाला, अरे हें काय? ज्या बाजूला अल्लाचें वास्तव्य त्या बाजूस पाय करून झोंपतोस काय? यावर नानक म्हणाले, अरे! एवढा गरम कां होतोस? ज्या बाजूला किंवा दिशेला अल्ला नाहीं, त्या बाजूला तूंच माझे पाय फिरवून ठेव.

मुल्लासाहेब काय जबाब देणार! अल्ला नाहीं कोठें? तो सर्वव्यापी आहे तो नाहीं अशी दिशा किंवा स्थळ कोणतें?

# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तास ठींसूचना

(व्यवस्थापकांकडून)

१. शिरडीस पोहोंचल्यानंतर चौकशी ऑफिसांत खोलीबद्दल चौकशी करा.

२. खोलींत सामान ठेवून कुलूप लावल्याशिवाय कोठेंहि बाहेर जाऊं नका.

३. सार्वजनिक हॉटेलमध्यें जागा मिळाली तर तुमचें सामान चिजवस्त सांभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मागावर असतात.

४. स्नानगृहांतून बाहेर येतांना पैशाचें पाकीट, दागिने, हातांतील घड्याळ, कपडे, भांडीं वगैरे बरोबर घेण्यास विसरूं नका.

५. अंगावर दागिने असलेल्या आपल्या लहान मुलांना एकटें सोडूं नका.

६. श्रींचे आरतीचे वेळीं धक्काबुक्की होते. त्यावेळीं आपल्या मुलांना संभाळा व आपल्या खिसा पाकीटांवर लक्ष ठेवा.

७. श्रींचे ऑफीस शिवाय कोणत्याही इतर ठिकाणीं अगर कोणाच्या हातांत पैसे देऊं नका. धर्म कृत्य फक्त संस्थेमार्फत करावें.

८. श्रींचे ऑफीसांत धर्म कृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागून घ्या.

९. श्री साईबाबा संस्थानचा, इतर ठिकाणीं श्री साईबाबांचे नावावर चाललेल्या संस्थांशीं कांहींही संबंध नाहीं.

१०. श्रींचा कोणी शिष्य नाहीं. अगर वारसदार गादीवर बसलेला नाहीं. अगर मध्यस्ती नाहीं. कोणी श्रींच्या पेहेरावासारखा पेहेराव केला म्हणून विश्वास ठेवून फसूं नका.

११. मार्गदर्शकाचें सोंग करून कांहीं अपरिचीत माणसें, शिरडीची स्थळें दाखविण्यासाठीं ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेऊं नका.

१२. श्रींचे नावांवर कांहीं माणसें जंतर मंतर, धागादोरा करणारे मांत्रीक तांत्रीक म्हणून फिरत असतात, त्यांचेपासून सावध रहा.

१३. श्रींचे नावांवर चालू असलेल्या सावली पत्रांस महत्व देऊं नका.

१४. श्रींचे बाबतींत आधारभूत माहिती, ऑफीसांत विचारावी. इतरांवर विश्वास ठेऊं नका.

१५. आपली कांहीं तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठीं ठेवलेल्या नोंद पुस्तकांत नोंदवा. आपलें पूर्ण नांव व पूर्ण पत्ता नोंदविण्यास विसरूं नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.

## श्रीसाईनाथ वाचनालय

गेल्या अंकीं शिरडी येथील श्रीसाईनाथ वाचनालयास देणगीदाखल ज्यांनीं पुस्तकें, मासिकें दिली त्यांची यादी प्रसिद्ध करण्यांत आली होती. त्यांत केवळ नजर चुकीनें क्रमांक ९ च्या बाबतींत नांवाची अदलाबदल झालेली होती. तरी तो मजकूर पुढील-प्रमाणें वाचण्यांत यावा: ९ सौ. अक्काबाई शंकर चांदोरे (नाशिक) यांजकडून श्यामची आई (मराठी) व श्री. मनोहर ना. सावंत (अहमदनगर) यांजकडून 'ट्रॅन्सपोर्ट रिव्ह्यू' हें इंग्रजी मासिक सुरू करण्यांत आलें आहे.

---

## हैद्राबाद सॅनिटोरियम

हैद्राबाद ( रमतापूर ) येथें खास क्षयरोग्यांसाठीं आधुनिक सुखसोयींनीं सुसज्ज असें हॉस्पिटल सुरू असून त्याची जाहिरात श्रीसाईलीलेंतून मधून मधून प्रसिद्ध होत असते व या अंकांतहि ती प्रसिद्ध होत आहे. हें सॅनेटोरियम हवेशीर ठिकाणीं असून तेथें दाखल होऊं इच्छिणाऱ्या गोरगरीब साईभक्तांस खास सवलती मिळूं शकतील; तरी गरजूंनीं त्यांचा जरूर फायदा घ्यावा.

---

माझा शिष्य असा कोणीहि नाहीं. मी मात्र सर्वांचा शिष्य आहें. सारीं माणसें भगवंताचीं लेकरें आहेत. सारीं माणसें त्याचे दास आहेत. तसाच मीहि त्याचा दास व त्याचें लेकरूं आहें.

लहान बालक आईसाठीं कसें तळमळत असतें ! तशीच जगन्मातेला भेटण्यासाठीं तळमळ व उत्कंठा लागून राहिली पाहिजे. म्हणजे तिला प्रेमाचा पान्हा फुटल्याशिवाय राहणार नाहीं.

आपली रोजचीं कामें नित्यनेमानें करीत जा. त्यांत कुचराई किंवा खंड केव्हांही पाडूं नका; परंतु त्याचबरोबर देवाला क्षणभरही विसरूं नका.

धर्माबद्दल व देवाकडे जाण्याच्या मार्गाबद्दल वादविवाद करीत बसूं नका. सर्व शक्तिमान् परमेश्वर एकच आहे. निरनिराळ्या भागांतून वहाणाऱ्या साऱ्या नद्या शेवटीं महासागराला मिळतात. त्याचप्रमाणें तुम्ही कोणत्याही धर्माचे अनुयायी असलां तरी तुम्हीं केलेली प्रार्थना परमेश्वराला पोहोंचल्याशिवाय रहाणार नाहीं.

—श्रीरामकृष्ण

× × ×

तुम्हीं जें कांहीं मनांत आणाल तें मिळवूं शकाल व करूं शकाल; परंतु त्यामागें दीर्घ प्रयत्नवाद पाहिजे. तुमच्या भाग्याचा विधाता परमेश्वर नसून तुमचे तुम्हींच आहांत.




## जानेवारी १९६०

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणेंच होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजरी दिली ती खालीलप्रमाणें :—

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. पुराणिक आळंदीकरबुवा. श्री. ह. भ. प. जेऊरकरबाबा जेऊर जि. नगर. श्री. मराठे. सं. गवई यांचीं दोन कीर्तनं झालीं.

**गायन व भजन :** श्री. त्रिपुरी शंकर त्रिपाटी अहमदाबाद, श्री. मनोहर जोशी मुंबई. श्री. ए. बी. शेख कु. सुरेशबाबू अ. नगर. श्री. विठ्ठलेश्वर वैजी सिकंदराबाद श्री. अमीचंद मास्तर मुंबई, सौ. चंद्रकलाबाई चाचड अंधेरी, श्री. चंदू कव्वालीवाला नासिक. सौ. शामला हालाडी, वांद्रा. सौ. राधाबाई भट्टुर मद्रास. श्री. सिंधू लाखे खेड.

**नृत्य :** कुमारी रेखा पाटील कोरेगांव, कुमारी लता बंडू पाटील कोरेगांव. जि. सातारा,

**सनईवादन :** श्री. कोंडाजी नथू सोनवणे, येवला.

**तबलावादन :** श्री. बाबूराव बापूजी बिडवे येवला, श्री. दगडू दिनकर लाखे खेड. श्री. दिनकर गणू लाखे खेड.

**थोरामोठ्यांच्या भेटी :** श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे सरकार, ग्वाल्हेर व श्री. महाराजे यांचेसह श्रीसाईबाबांचे समाधीस महापूजा अभिषेक श्रीसाई सत्यनारायण पूजा, महानैवेद्य वगैरे धार्मिक कृत्यें अत्यंत भक्तीपूर्वक केलीं. समागमें श्रीमंत सरदार नानुभैय्या यांनीं अशीच धर्मकृत्ये केलीं.

**प्रजासत्ताक दिनाचा सोहळा :** ता. २६–१–६० प्रजासत्ताक दिनानिमित्त श्रीसाई मंदिर, श्रीद्वारकामाई, श्री चावडी वगैरे ठिकाणीं दिव्यांची रोषनाई ध्वजवंदन कीर्तन, गायन, भजन, शाळेंतील मुलांमुलींचें संवाद, गाणीं, नाट्यछटा, असा कार्यक्रम संस्थानचे व्यवस्थापक अधिकारी यांचे देखरेखीखालीं झाला.

**शिर्डीची हवापाणी :** आतां थंडी हळुहळू कमी पडत आहे. बाकी हवा उत्तम आहे.

---





त्चा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा:—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**







★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकला वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

**५२५, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई**

टेलिफोन : ७५०७७

डी. डी. नेरॉय यांनी तयार केलेले श्री साईबाबांचे तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. लक्ष्मण केरू नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : रा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व [illegible]



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

ईश्वर प्राप्तीचे चार मार्ग म्हणजे कर्म, ज्ञान, योग व भक्ति हेच होत. यांपैकीं कोणत्याही मार्गानें जा. तुम्हांला भगवंताची प्राप्ति होईल. त्यांपैकीं भक्ति मार्ग हा अनेकांनीं रुळविलेला मार्ग आहे. परंतु त्या मार्गानें जायचें म्हणजे, बाभूळ वनांतून जाण्यासारखें आहे. त्या मार्गांत खांचा, खळगे, कांटेकुटे अनेक आहेत. त्या एकपावली वाटेनें जपून, संभाळून पावलें टाकीत गेलें, तर त्या वाटेनें निश्चितपणें हरिचरणांपाशीं जातां येतें. मात्र कांटे टाळून पावलें टाकीत गेलें पाहिजे; आणि हाच सर्वांत सुलभ मार्ग आहे. जर निर्धारपूर्वक व निर्भयपणें त्या मार्गानें तुम्ही जाऊं लागाल तर तोच मार्ग तुम्हांला मोक्षाप्रत नेईल असें गुरुमाउलीचें निक्षून सांगणें आहे.

— श्रीसाईसच्चरित्

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ] मे १९६० [ अंक २ रा

: संपादक :

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# प्रिय वाचक—

श्रीसाई लीलेचा हा अंक वाचकांच्या हातीं पडेल त्या सुमारास आमचे महाराष्ट्रीय व गुर्जर बांधव नवमहाराष्ट्र व नवगुजरात निर्मितीच्या आनंदोत्सवांत गुंतलेले असतील. आमच्या दोन्हीं समाजबंधूंच्या वाट्यास येणारा हा आनंद व हें भाग्य खरोखर आगळें आहे. त्या सर्वांच्या आनंदांत आम्हीं संपूर्णपणें सहभागी आहोंत.

जो साईभक्त आहे, त्याच्याठायीं दुजाभाव संभवतच नाहीं. आपण सर्व त्यांच्यावर श्रद्धा ठेऊन वागणारे आहोंत. बाबांच्याठायीं प्रांतभेद, समाजभेद किंवा जातिभेद असला प्रपंच नव्हता. त्यांचा सर्वांठायीं समभाव होता. प्रत्येकानें आपापल्या मार्गानें जाऊन, आपला उद्धार साधावा; कोणी कोणाच्या आड येऊं नये; प्रत्येकानें दुसऱ्याशीं बंधुभावानें वागावें; एकमेकांनीं एकमेकांस सहाय्य करावें, 'एकमेकां सहाय्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥' हाच त्यांनीं दाखवून दिलेला कल्याणाचा मार्ग आहे व त्याच मार्गानें जाण्यांत सर्वांचें कल्याण आहे.

एकमेकांच्या सीमा, धंदा रोजगार, धर्म, चालीरीति वगैरे अनेक बाबतींत इतर कोणाहीपेक्षां महाराष्ट्रीय व गुर्जर बंधूंचें नातें अत्यंत निकटवर्ति व जिव्हाळ्याचें आहे. आणि म्हणूनच बाबांच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास —

ऋणानुबंधाचिया गांठी । भाग्यें आम्हां तुम्हां भेटी ।
धरूं परस्पर प्रेम पोटीं । सुखसंतुष्टी अनुभवूं ॥

किती बहुमोलाचें बोधामृत बाबांनीं या ओवीच्याद्वारें आम्हां सर्वांना पाजलें आहे ! तें अंमलांत आणण्यासाठीं झटणें यांतच यापुढील काळांतील उभय समाजांचा भाग्योदय सामावून राहिलेला आहे.

इतकीं वर्षे हा सारा व्याप आपण कशासाठीं केला ? सुख, समाधान व आनंद लाभावा म्हणून; आणि त्या जीवनावश्यक तिन्ही गोष्टी एकमेकांशी बंधुभावानें व हातांत हात घालून चालण्यानें साध्य होणार आहेत.

हिंदु हिंदूंतच काय, परंतु हिंदु अहिंदूंतहि नेहमीं ऐक्यभाव राखतां आला पाहिजे. आमचा उत्कर्ष, एकमेकांशीं चढाओढ करण्यांत, एकमेकांचे पाय मागें खेंचण्यांत व एकमेकांचा हेवा, मत्सर करण्यांत नसून, तो परस्पर सहकारांत व सहजीवनांत आहे हें आम्हीं ओळखलें पाहिजे. बाबा म्हणतात कीं,

'काय तुम्हीं लेकरें मूढ । बांधा हिंदु—अविंधाची सांगड ।
व्हा दृढ सुविचारारूढ । तरीच पैलथड पावाल ॥

आम्हां सर्वांना यशाचें पैलतीर गांठावयाचें आहे. त्याची मुहूर्तमेढ आज आपण नवराष्ट्र निर्मितीचा पाया घालण्याच्या रूपानें रोवीत आहोंत. या पुढील बांधणीच्या व उभारणीच्या कार्यांत आम्हीं आमचीं पावलें कशीं व कोणत्या मार्गानें टाकावयाचीं याचें मार्गदर्शन श्रीसाई बाबांनीं आमच्यासाठीं यापूर्वींच करून ठेविलें आहे; तो मार्ग आपण चोखाळूंया व यशाचा झेंडा फडकवूं या !

— संपादक.

—※—

## बाबांची लीला

(चाल : हरीभोंवतीं नित्य नाचतो भक्तांचा मेळा)

सांईभोंवती नित्य जमति ते, नवे नवे भक्त ।
सांई सर्वांना पसंत ॥ ध्रु० ॥

टांगा घेऊनि जामनेरचा ।
आणि पाहुणा नाना घरचा ।
उदी आरती देउनि तनया ।
प्रसूति ना कष्ट ॥ १ ॥

बाळ बोलवी उद्यापनाला ।
दों शिष्यांसह आशि डहाणुला ।
भोजन करूनी अज्ञ मनाला ।
करि पदिं आसक्त ॥ २ ॥

दासगणूंचें श्रुतींचें केणें ।
समर्थभावें दैन्य मिरविणें ।
अज्ञ अशिक्षित हीन मुलीनें ।
दावुनि आनंद ॥ ३ ॥

बाबांच्या बाळाचें बाळ




## एका मुलावर बाबांची कृपा

श्री. भास्करराव गोविंद सावंत, फायर ब्रिगेड ऑफिसर, भायखळा–मुंबई, यांची, त्यांच्या पत्नीची, व घरांतील सर्वांची श्रीसाईबाबावर निस्सीम श्रद्धा आहे. विशेषतः त्यांच्या पत्नीचें विवाहापूर्वी शिरडी येथें बाबांच्या दर्शनासाठीं जाणेंयेणें घडत असे, परंतु विवाहानंतर कांहींना कांहीं कारणामुळें मनांत असूनही त्यांचें जाणें घडलें नाहीं. त्यांच्या घरीं घरकामासाठीं वयाच्या सुमारें ७।८ वर्षांपासून धनाप्पा अण्णाप्पा कुंभार या नांवाचा मुलगा असून आज तो १५।१६ वर्षे वयाचा आहे. त्याची श्रीसाईबाबावर निष्ठा बालवयापासून होती व उत्तरोत्तर ती वाढत गेली. साईबाबांसंबंधीं कांहीं असलें तरी तें आवडीनें व भक्तिभावानें वाचण्याकडे त्याचा कल होता. श्रीसाईलीलेचे अंक, साधन मंजिरी, शिवस्तुति वगैरे पुस्तकें वाचण्याचा त्याचा परिपाठ होता. त्याची शिरडीस जाण्याची तळमळ, त्याचें तिकडे अचानक जाणें कसें घडलें, वगैरे संबंधीं माहिती आमच्याकडे खात्रीलायक मार्गानें आल्यामुळें तिला प्रसिद्धी देण्यांत येत आहे.

गेल्या रामनवमीच्या आठवड्यांतील गोष्ट. श्रीरामनवमीपूर्वी दोन दिवस बाबा पहांटेच्या प्रहरीं त्याच्या स्वप्नांत आले व म्हणाले, 'काय रे! तुला शिरडीस जायचें आहे ना? मग परवां पहाटे मी तुला नेण्यासाठीं येईन. तुझे कपडे व पांघरायला चादर वगैरे घेऊन तयारींत रहा,' त्याप्रमाणें तो मुलगा निमूटपणें तयारींत राहिला.

सांगितल्याप्रमाणें केस पिकलेले, दाढी वाढलेली अशा वेषांत बाबा त्याच्या घरीं आले. तो पहांटेचा प्रहर होता. दार आपोआप उघडलें गेलें. त्या मुलास उठविलें. तो उठला. त्यानें बांधून ठेवलेले आपले कपडे घेतले व आलेल्या गृहस्थाबरोबर बाहेर पडला. दार आंतून लागलें व कोणालाहि चाहूल न लागतां त्यांच्यासह तो बोरीबंदर स्टेशनवर येऊन गाडींत बसला. बाबा त्याच्याबरोबर होते. गाडींत तिकिट चेकर आले पण त्याला तिकीट कोणीहि विचारलें नाहीं. बाबा त्याच्या सांगाती होते. प्रवासांत 'तुला भूक लागली आहे का?' म्हणून त्यांनीं विचारलें. 'होय' म्हणतांच त्याला भाकर व बटाट्याची भाजी खायला दिली. कोपरगांव स्टेशनावर उतरल्या-नंतर शिरडीस जाणाऱ्या बसमध्यें बसून दोघेहि शिरडीस गेले. तेथें गेल्यानंतर बाबानीं त्याला द्वारकामाई, दळण दळलें तें जातें व इतर स्थळें दाखविलीं. त्याचें समाधान झालें. समाधि मंदिरांत नेलें. तेथें बाबांची

मूर्ति तो टक लावून पाहूं लागला. 'ही कोणाची मूर्ति ?' म्हणून त्यांनीं त्या मुलास विचारलें. त्यानें बरोबर उत्तर देतांच ही माझीच प्रतिमा म्हणून बाबानीं त्याला सांगितलें. नंतर त्याच्या जेवणाची व्यवस्था केली.

शिरडीहून निघण्यापूर्वी बाबानीं त्याला शिरडीचा प्रसाद म्हणून पेढे, कुरसुरे देऊन तुझें व तुझ्या मालकाचें कल्याण होईल असें म्हणाले. तसेंच खर्चासाठीं त्याच्या हातीं वीस रुपये देऊन म्हणाले, ' आतां तूं परत मुंबईस जा. जाशील ना ? तुझी इच्छा पूर्ण झाली. तुला माझा आशीर्वाद आहे. दरवर्षी शिरडीला येत जा. ' एवढें सांगून त्याला निरोप दिला.

इकडे श्री. सावंत यांच्या घरीं मुलगा कुठें दिसेना म्हणून गडबड उडाली. तपास सुरू झाला. घरांतील माणसांजवळ तो नेहमीं म्हणायचा कीं, मला शिरडीला जायचें आहे. बाबांची इच्छा असली तर ते मला घेऊन जातील असेंही म्हणत असला तरी कोणी नेल्याशिवाय कसा जाणार ? असें वाटणें सहाजिक होतें. मुलाच्या चिंतेंत असतां त्या मुलाचें आपण शिरडीस आलों असून सुखरूप आहें. अशा अर्थाचें पत्र आलें. चौकशीअंतीं समजतें कीं, बाबांनींच त्याला कार्ड देऊन खुशाली कळविण्याबद्दल सांगितलें होतें.

× × ×

## ' गंध लावीत जा ' —

सौ. सरलाबाई आर. पाटील, कोल्हापूर, शुक्रवार पेठ, घर नं. २७३३, या लिहितात कीं —

आम्हीं पुष्कळ दिवसांपासून श्रीसाईबाबांची पूजा करतों व भक्ती करतों. माझे पती श्री. आर. जे. पाटील रोज बाबांच्या फोटोची पूजा करतात. नेहमीप्रमाणें त्यांनीं पूजा केली व नैवेद्य आणावयास आंत आले आणि परत जाऊन पाहतात तों श्रीसाईबाबांच्या उजव्या पादुकांवर उदीचा ढीग व सबंध खोलींत सुगंध दरवळला होता. आम्हां सर्वांना अतिशय आनंद झाला. बाबांची लीला किती अगाध आहे पाहा—

तसेंच दृष्टांत असा झाला कीं, मी साईबाबांना दररोज कुंकू लावीत असें पण एके दिवशीं मी बाबांना कुंकू लावतांच मला बाबा हलल्याचा भास झाला. असें कां झालें ? बाबा रागावले काय ? माझ्याकडून काय चूक झाली म्हणून मला दिवसभर चैन पडलें नाहीं. रात्रीं बाबा स्वप्नांत येऊन म्हणाले ' मुली तूं भिऊं नकोस. मी रागावलों नाहीं. हें बघ तूं तुझ्या देवांना (आम्ही जैन लोक देवीला कुंकू लावतों. देवांना गंध लागतों ) कुंकू लावतेस काय ? मी उत्तर दिलें ' नाहीं.' मग तूं तुझ्या धर्मांत सांगितल्याप्रमाणें मला गंधच लावीत जा व दृढ निश्चयानें धर्मपालन करून माझी भक्ति कर. मी कांहीं वेगळा नाहीं. तुमचाच आहें !' एवढें सांगून गुप्त झाले. बाबांची भेट झाल्यापासून मनाला समाधान झालें व तेव्हांपासून मी बाबांना गंध लावूं लागलें.

पुढें माझी मुलगी सौ. उषाताई बाबूराव हरदी, माधवनगर जि. दक्षिण सातारा ही आली असतांना आम्ही 'श्रीसाईसच्चरित' या पोथीचा सप्ताह सुरू केला. तो सर्व यथासांग पार पडला. गुरुवारीं रात्रीं तिच्या स्वप्नांत बाबा येऊन काठी टेकून उभे राहिले अन् सर्व घर हिंडून पाहिलें व तेथेंच अदृश्य झाले. सकाळीं उठून पाहतें तों काय आश्चर्य ! कपाटाच्या दारावर बाबांचा पाय स्पष्ट उमटलेला दिसला. हा दृष्टांत चाळींतील सर्व लोकांनीं पाहिला व सर्वांना बाबांच्या अगाध लीलेबद्दल आश्चर्य वाटलें. अशारीतीनें श्रीबाबांनीं आम्हा सर्वांची आपल्यावरील व धर्मावरील श्रद्धा बळकट केली आहे. श्री साईबाबांच्या कृपेनें व आशीर्वादानें आम्ही सुखांत आहोंत. अशीच बाबांची सेवा घडावी हीच इच्छा आहे.

× × ×

## शिरवळ व शिरडी

श्री. द. पां. ऊर्फ बगोबा मोने, शिरवळकर, मु. शिरवळ हे आपला एक जुना अनुभव कळवितात कीं, शिरवळपासून ६–७ मैलांवर श्री. शंभुराव पोतनीस यांचें वडगांव या नांवाचें इनाम गांव आहे, तेथें मी आज सतत ३० वर्षे नवरात्रांत १० दिवस कर्नाटकी पद्धतीची पूजा त्यांना दररोज सहा तास सांगत असतों. तें माझें यजमान कृत्याचें घर आहे. ती पूजा फार जिकीरीची व भानगडीची असते. एरवींच्या नवरात्राच्या पूजेसारखी नसते. त्या पूजेंत पुन्हां निरनिराळ्या देवतांच्या पूजा आहेत. योगिनी आहेत, कलश आहेत, मंडलें आहेत, त्रिकोण आहेत, चतुष्कोण आहेत, षट्कोण आहेत–सारांश, कांहीं महिने चांगला अभ्यास केल्यावाचून ती पूजा दुसऱ्या कोणास सांगतां येण्यासारखी नाहीं.

पहिल्या वर्षी माझ्या मनांत बाबांच्या पुण्यतिथी दिवशीं आराधनाविधी चालविण्यास शिरडीस जावें असें आलें. येथें ज्या साईमाऊलीच्या प्रेरणेनें काका देव यांच्याकडून श्रीदत्तमंदिर बांधण्यांत आलें व ज्या साईदत्ताची अलौकिक ख्याति मी काकांच्या मुखांतून ऐकिली, त्याच साईदत्ताच्या प्रेरणेनें मला शिरडीस येण्याची इच्छा झाली. पुण्यतिथि दसऱ्याच्या दिवशीं किंवा दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशीं शंभुराव यांच्या घरची नवरात्रसमाप्ति दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं तेव्हां माझी इच्छा सफल व्हावी कशी ? मला मोठा पेंच पडला. आराधनाविधि चालविण्याकरितां शिरडीस जावें, ही प्रबल व अनावर इच्छा व जाण्यास शंभुरावजीकडून परवानगी मिळणार नाहीं, ही भयंकर अडचण.

चमत्कार असा कीं, शके १८५३ सालीं शिरवळ येथें श्रीदत्त मंदिराचें काम जेव्हां सुरू झालें, तेव्हां शंभुराव पोतनीससाहेब सहज शिरवळ येथें आले. मी मनाचा हिय्या करून भीतभीत त्यांच्याजवळ आठव्या किंवा नवव्या माळेस शिरडीस जाण्याची परवानगी मागितली व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें दिली. त्यांची मात्र मला २ दिवसांची

सोय करून द्यावी लागली व ती माझ्या १७–१८ वर्षांच्या वडील मुलानें करण्याचें पत्करिलें. त्यामुळें मला शिरडीस आराधनाविधीच्या अगोदर १ किंवा २ दिवस बिनधोक येतां आलें. काय ही बाबांची लीला !

यावरून शिरवळ व शिरडी यांत विलक्षण साम्य असून दोन्ही ठिकाणच्या देवता एकरूप आहेत व दोन्ही ठिकाणचे संतमहात्मे एकाच गुरूचे शिष्य असावेत असें वाटतें.

× × ×

## ऐन वेळीं अब्रू बचावली

श्री. लक्ष्मण विठ्ठल नाडकर, माहीम बाजार, मुंबई हे आपल्या एका मित्राचा व स्वतःचा अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात :—

हे माझे स्नेही एक उद्यमशील गृहस्थ आहेत. आपला उद्योग आणि आपलें घर याखेरीज त्यांना दुसरा कांहीं व्यवसाय नाहीं. हे स्नेही श्रीसाईबाबांचे उपासक आहेत. एके वेळीं त्यांनीं रुपये पांचची एक नोट श्रीसाईबाबांच्या प्रीत्यर्थ पाठविली. ती होती १० रुपयांची. तेव्हां ही नोट कांहीं सूचक हेतूनें आली असावी असें वाटून त्यांतले पांच रुपये जमेस होऊन बाकीचे पांच रुपये आपल्या देव्हाऱ्यांत जपून पूजेच्या साहित्यांत ठेवा अशी त्यांना सूचना झाली होती आणि त्याप्रमाणें ते पांच रुपये त्यांनीं जपून देव्हाऱ्यांत ठेवले होते. त्यावेळीं त्यांची सांपत्तिक स्थिति बरी होती.

पुढें कांहीं अकल्पित प्रकारामुळें त्यांची स्थिति खालावत गेली. ती इतकी कीं, एके दिवशीं त्यांना बाहेरगांवाहून मालाची मागणी आली असतां आणि त्या व्यापारांत त्यांना प्राप्ति असूनही आगगाडी भाडें रु. ४ अकरा आणे भरण्याला त्यांच्याजवळ पैसे नव्हते. जीव व्याकुळ झाला. पैसे भरण्याची वेळा भरत आली. आतां काय करावें ' बाबा ! हे तुमच्या पूजेंतले रुपये दुःखित मनानें घ्यावे लागत आहेत, काय करूं ! ' असें म्हणून ते पांच रुपये हातांत घेऊन खोलींतून बाहेर पडतात, तों हे अमृतराव मुळे माझ्या स्नेह्याला अचानक दारांत भेटले. ' अहो, तुमचे दहा रुपये मी कांहीं महिन्यापूर्वी उसने घेतले होते आपले ते परत घ्या पाहूं. इतके दिवस परत करूं शकलों नाही, क्षमा असावी ' असें ते म्हणाले.

काय श्रीसाईमाउलीची ही लीला तरी ! माझ्या स्नेह्यानें ते पांच रुपये देव्हाऱ्यांत परत ठेऊन, आगगाडीचें माल भाडें रुपये ४।।≶ भरले आणि ' बाबा ! आज ऐन वेळेवर अब्रू वाचवलीत ! ' असें बोलून ते घरीं परत आले.

## शब्द खरा ठरला

मी मुळेलेकरांसहित श्रीसाईबाबांच्या दर्शनास सन १९१६ सालीं गेलों होतों. श्रीच्या सेवेंत आनंद वाटला. इतका खर्च करून व दगदग सोसून श्रीचरणांपाशीं आल्याचें सार्थक झालें असें वाटून इकडून हालूं नये असेंहि वाटलें.

यांप्रमाणें आम्ही सर्व आनंदांत असतां एके दिवशीं सकाळीं आम्हांला परत जाण्याची आज्ञा झाली. परत जाण्याची आज्ञा न मागतां झालेली. आणि शिर्डीस श्रीचरणांजवळ राहण्याची उत्कंठा यामुळें वाटलें.

मध्यान्हीच्या आरतीच्या वेळीं आम्ही सर्व हजर होतों. बाबा त्यावेळीं कांहीं बोलले नाहींत. दोन प्रहरीं तीन वाजतां दर्शनाच्यावेळीं पण कांहीं बोलले नाहींत. त्यानंतर सायंकाळपूर्वी बाबा फिरावयास निघतात, त्यावेळीं पायां पडतांना 'अरे, तूं अजून राहिला आहेस ? तुला सकाळींच जा म्हणून सांगितलें होतें ना ? जा आताच्या आतां; जा तुला गाडी मिळेल.'

संध्याकाळचा सुमार ! पावसाळीचे दिवस ! नदीला नाव ! बाबांचा हुकूम ! आतां कसें ? बाबांचा हुकूम मोडवेना. एक टांगा कर्मधर्मसंयोगानें मिळाला. त्यांत बसून दुःखित मनानें आम्ही शिर्डी सोडली. जेमतेम करून नदीकिनारा गांठला. अंधार पडावयास लागलेला. नांव पैलतीरावर. हांका मारून नांव इकडे आणा म्हणून पुकार करतां, नावाडी 'सांज पडली, नांव चालविण्याचा हुकूम नाहीं' म्हणून बोलले. घोर विवंचनेंत पडलों. बाबांचा धांवा केला. इतक्यांत थोड्या वेळानें एक टांगा आला, त्यांत कोपरगांवचे मामलतदारसाहेब होते. त्यानीं आम्हाला धीर दिला. साहेबांच्या शिपायानें पुकार करतांच नावाड्यांनी नाव आमच्या तीरावर आणली, आम्ही सर्व मंडळी पैलतीरावर गेलों.

एक तर अंधार पडलेला, नावेसाठीं पाऊण तासाचा आणखी विलंब. टांगेवाल्यानें व इतर मंडळीनें आतां गाडी चुकलीच, तुम्हीं आज रात्रीपुरते देवळांत मुक्काम करा व सकाळीं जा अशी सल्ला दिली. गांव परकें, अनोळखीचें, बरोबर स्त्री व मुलें, मुली. अंगावर थोडेंतरी खिडुकमिडुक. विवंचना सुरू झाली, बेचैन झालों. परंतु बाबांचें आश्वासन 'स्टेशनवर जा ! तुला गाडी आहे' या शब्दांवर पूर्ण भरंवसा ठेवून तसाच टांगा स्टेशनकडे हांकला. रस्त्यांत अंधार घुडुप व चोरांची भीति. पण बाबांच्या शद्बांवर विश्वास ठेवून तो तीन मैलांचा रस्ता कापून एकदांचें कोपरगांवचें आगगाडीचें स्टेशन गांठलें. सामान उतरलें. पुढें काय करावयाचें याचा विचार करतां, स्टेशनवर बरीचशी उतारू मंडळी दिसली. धीर आला. मास्तराकडे तपास करतां त्यांनीं आश्वासन दिलें कीं गाडी दोन तास लेट आहे, आतां येईल. त्यांनीं टिकिटें दिलीं. गाडी थोड्या वेळानें आली. अत्यंत आश्चर्य करीत सर्व मंडळी सप्रेम भावनेनें शिर्डीकडे तोंड करून, श्रीसाईबाबांच्या नांवाचा जयघोष करीत गाडींत बसलों. एका तासानें मनमाड गांठलें. तेथें यथेच्छ फराळ करून मध्यरात्रीं नंतर एक वाजतां मेलगाडी गांठून आम्ही सर्व मंडळी सकाळ उजाडतांच मुंबईस पोंहोंचलों. काय ही बाबांची लीला !

× × ×

**बाबांचा कृपाप्रसाद**

पार्ल्याहून एका साईभक्तानें आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळविला आहे :—
ह्या गृहस्थांनीं आपलें नांव प्रसिद्ध करूं नये म्हणून आग्रह केला आहे आणि

ती त्यांची विनंति यथासांग आहे, हें पुढील हकीगत वाचल्यावर वाचकवृंद मान्य करतील.

गेल्या विजयादशमीच्या पहांटेस त्यांना स्वप्न पडलें :—

स्वप्नाची हकीगत सांगण्यापूर्वी त्या संबंधाची पूर्व पिठिका अशी घडलेली होती :—

सध्यांच्या परिस्थितीप्रमाणें त्यांच्याही कचेरींत कापकूप व कारकून वगैरे कमी करणें हा प्रकार चाललेला होता. आपली नोकरी एकतीस वर्षांची येत्या जानेवारी ( म्हणजे जानेवारी १९३५ ) अखेर व्हावयाची असल्यामुळें आणि आपल्या वयाची पंचावन्न वर्षें पुरीं झाल्यामुळें आपणांस नोकरीमुक्त व्हावयाची सूचना मिळायचीच, असें समजून व त्याप्रकारची सूचना पदरांत पडण्यापूर्वीच आपण होऊन राजीनामा देणें युक्त वाटून आणि हाताखालचे तसेंच उपरीवर्ग तसें जाणूनबुजून न करण्याची सल्ला देत असतांही त्यांनीं विजयादशमीपूर्वी अनेक महिने त्याप्रमाणें राजीनामा लिहून पाठविला होता; व त्यासंबंधीं निश्चित मनानें होते.

विजयादशमीच्या पहाटेस त्यांना स्वप्न पडलें कीं, त्यांच्या अमेरिकन मुख्य कचेरीचे प्रमुख मॅनेजिंग डायरेक्टर जे पूर्वीच रिटायर्ड होऊन सध्या केवळ हौसेनें त्या कचेरीचें कामकाज पाहत असतात, ते त्यांच्या भेटीस पार्लें मुक्कामीं आले.

हे मोठे साहेब एकाएकीं घरीं आल्यामुळें लगबगीनें उठून आपण आपल्या बिछान्याची वळकटी केली. साहेब चटईवरच बसले, आणि खिशांतून काड्यांची पेटी काढून तीन दमडीचे घासलेटचें टिन जवळ होतें, तें त्या साहेबानें पेटवून त्याच्या मिणमिण जळणाऱ्या उजेडांत खिशांतले कागद काढून वाचूं लागले.

हे साहेब पूर्वी इकडील मुंबईच्या कचेरींत वर्क मॅनेजरच्या हुद्यावर होते. माझ्यावर त्यांचा लोभ होता. पुढें त्यांचा हुद्दा वाढत जाऊन ते मुंबईच्या कचेरींत उपरी झाले. नंतर अमेरिकेंत मुख्य कचेरीचे ते एक डायरेक्टर होऊन पुढें म्यानेजिंग डायरेक्टर या सर्वश्रेष्ठ हुद्यावर त्यांची बढती होऊन नंतर रिटायर्ड होऊन, केवळ स्नेहबुद्धीनें कांहींहि लवाजमा न घेतां ते कामकाज पाहतात व सल्ला मसलत देत असतात.

म्हणून असा मोठा माणूस आपल्यासारख्या यःकश्चित् मनुष्याच्या घरीं अचानक येतो काय! चटईवर बसून त्या मिणमिण जळणाऱ्या तीन दमडीच्या घासलेटाच्या दबड्याच्या उजेडांत कागदपत्र वाचतो काय! याचें राहून राहून मला आश्चर्य व दुःखही वाटलें.

साहेब कागद वाचीत असतां आपण पाठविलेल्या राजीनाम्याचें काय झालें म्हणून हिय्या करून त्यांना विचारतां "तूर्त विचारांत घेतां येत नाहीं." असें बोलून ते साहेब व तो सर्व देखावा नाहींसा झाला.

खडबडून जागा झालों. "बाबासाहेब! कुठला साहेब आणि कुठलें काय! तो

पलीकडच्या खोलींतला मोठा साहेब ( देव्हाऱ्यांतील श्रीसाईबाबा ) येऊन त्यानें हा सर्व खेळ दाखविला नि दुसरें काय !' असें गहिंवर येऊन ते सेवकाला बोलले !

× × × ×

**शेवटीं उदीच रामबाण ठरली**

**श्री.** मुकुंद रघुनाथ परुळकर सहाय्यक स्टेशनमास्तर, खोंगसारा स्टेशन विलासपूर हे लिहितात कीं, गेल्या दोन पिढ्यांपासून श्रीसाईबाबा हेंच आमचें आराध्य दैवत आहे. मी. द. कर्ग रेल्वेच्या विलासपूर विभाग खोंगसारा स्टेशनवर सहाय्यक स्टेशन मास्तर आहे. माझी नोकरी सदैव रात्रपाळीची. सतत पंधरा दिवसांपासून शौचाच्या-मार्गें भळभळ रक्त जात असे. मला दुसरी कसली व्याधि नव्हती. लहान खेडेवजा गांव. तेथें शक्य ते इलाज केले. सुधारणा कांहींच घडून आली नाहीं. शेवटीं होण्यासारखे होते ते इलाज करून थकल्यानंतर सर्वशक्तिमान् श्रीसाईबाबांवर सर्व भरिभार ठेऊन त्यांचें मनोभावें चिंतन सुरू केलें. औषधें बंद करून रात्रौ झोपतांना शिरडीहून आणलेली उदी पाण्यानें घोळून घेण्यास सुरुवात केली. असा उपक्रम चार दिवस चालू ठेवल्यानंतर रक्त जाणें एकदम थांबलें व आतां त्या व्याधींतून मी सर्वस्वी मुक्त झालों आहें. पुढील महिन्यांत बाबांच्या दर्शनासाठीं शिरडीस सहकुटुंब जाण्याचा विचार आहे.

---

**लहान मुलांच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

↔

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

↔

: स्टॉकिस्ट :
**कांचनलाल वाडीलाल कं.**
दवाबझार, मुंबई २

**अर्नाळकर ब्रदर्स**

**चष्म्यांचे व्यापारी**

आमच्या येथें **डोळ्यांची मोफत तपासणी** करून शास्त्रोक्त चष्मे **वेळेवर** तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :
**बाबूराव अर्नाळकर**
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, **मुंबई ४**
**वि. सू:**—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# यंदाचा श्री रामनवमी महोत्सव

( सोमवार दि. ४ एप्रिल ते दि. ६ एप्रिल १९६० )

वर्षातून सार्वजनिक रीत्या साजरे केले जाणारे शिर्डी येथील उत्सव म्हणजे श्री रामनवमी उत्सव, श्रीगुरुपौर्णिमा उत्सव व श्रीपुण्यतिथी उत्सव; श्री रामनवमीच्या नंतर श्रीगुरुपौर्णिमा व त्यानंतर श्रीपुण्यतिथींचे उत्सव अगदीं लवकर आल्यासारखे वाटतात; पण श्रीपुण्यतिथी व श्री रामनवमी ह्या दोन उत्सवांमध्यें मात्र दरम्यान बरेच महिने जातात. श्री गोकुळ अष्टमी व श्री दत्तजयंतींचे उत्सवही निमंत्रण द्वारा साजरे केले जावेत अशी व्यवस्थापक समितीस सूचना करावीशी वाटते. श्री सद्गुरुसाईनाथ महाराजांना आपण श्रीदत्ताचे अवतार मानतों, व त्यांनीं श्रीकृष्णभगवानाप्रमाणें आपल्या कित्येक भक्तांना पूर्वजन्म सहवासाच्या आठवणी देऊन 'बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन। तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ( अध्याय ४ श्लोक ५ )' या श्लोकाचा अनुभव दिला आहे; पण ह्या सर्वा पेक्षा हल्लीं श्री साईंनीं अशी किमया केली आहे कीं दर गुरुवार व रविवार हे उत्सवाचेच दिवस आहेत असें वाटतें. त्या दिवसांत व उत्सवांच्या दिवसांत फरक एवढाच कीं उत्सवांत एक रात्र समाधिमंदिर खुलें रहातें व २४ तास श्रीसाईनामसंकीर्तन व श्रीसाईसच्चरित् पारायण हे कार्यक्रम होतात व तिसऱ्या दिवशीं कालाकीर्तन होतें; ही खरोखरच अतिशय आनंदाची व अभिमान वाटण्यासारखी प्रगति आहे. ह्या प्रगतीला पुष्कळ कारणें आहेत. श्रीसद्गुरूंच्या दिव्य चरणीं प्रार्थना हीच आहे कीं, त्यांच्या भक्तीचा डिंडिम सदैव असाच ज्यास्त प्रमाणांत निनादत राहो व आमच्या व्यवस्थापक समितीला श्रीसद्गुरूंच्या कृपाशीर्वादानें भक्तांच्या जास्तींत जास्त सोयीकरतां याव्यात.

श्रीरामनवमी उत्सव म्हटला कीं दोन भाग डोळ्यांसमोर उभे रहातात. एक भाग म्हणजे श्रीरामायणाचें पारायण, कीर्तनें, व दुसरा भाग म्हणजे कावडी स्नान, श्रीसाईनाम संकीर्तन, श्रीसाईसच्चरित पारायण, मुख्यदिनीं जागर, पालखीची व रथाची व निशाणांची मिरवणूक.

यंदा दि. ३ रोजीं व्यवस्थापक समितीची सभाहि शिरडीस घेण्यांत आली होती. ह्यामुळें श्रीसद्गुरु चरणीं तितकेच जास्त दिवस रहाण्याचें भाग्य लाभलें. अलिकडे गेलीं १०–१२ वर्षें हा उत्सव इतक्या आनंदमय व खेळकर वातावरणांत साजरा केला जातो कीं, ही श्रीसाईलीला पाहून मनाला समाधान वाटतें. श्रीसाईसच्चरित् अध्याय ६ मध्यें खालील ओव्या आहेत.

शके अठराशें तेहतीस सालीं । रामनवमी प्रथम झाली ।
उरूसापोटीं जन्मास आली । तेथूनि चालली अव्याहत ॥ ५९ ॥

गुलालाचें केवळ मिष । रामजन्माचा तो आवेश ।
होईल अहं रावणाचा नाश । दुर्वृत्ति–राक्षस मरतील ॥ ८५ ॥

असो, पुढें एके दिवशीं । दासगणू येतां शिर्डीसी ।
देवविला प्रार्थूनि बाबांसी । उत्सव प्रतिवर्षीं तयास ॥ ११८ ॥

तेथूनि पुढें ह्या कालवरी । होताहे जन्मोत्सव गड गजरीं ।
अन्न संतर्पण आकंठवरी । महारापोरीं आनंद ॥ ११९ ॥

ह. भ. प. दासगणू महाराज हल्लीं वार्धक्यामुळें शिर्डीस येऊं शकत नाहींत, पण त्यांच्या वतीनें आयुर्वेद पारंगत ह. भ. प. अनंत तथा अप्पाशास्त्री आठवले हे ह्या उत्सवांत कीर्तन मेवा देत असतात. किंबहुना ही कीर्तनें ही ह्या उत्सवांतलें फार मोठें आकर्षण असतें. हीं कीर्तनें अत्यंत विद्वत्ताप्रचुर, रसाळ व प्रेमळ आख्यानांनीं नटलेलीं असतात.

यंदा दि. १ एप्रिल ६० रोजीं रात्रौ ह्या लेखकानें कीर्तनाची हजेरी दिली. दि. २ एप्रिल व ३ एप्रिल रोजीं रात्रौ, ह. भ. प. तुकारामबुवा आजगांवकर ( ह. भ. प. दासगणू महाराजांचे शिष्य व फार सुंदर आवाज असलेले विनोदी कीर्तनकार ) यांची कीर्तनें झालीं; पहिल्या दिवशीं श्री. तुळशीदासजी यांचें आख्यान व दुसरे दिवशीं श्री. चोखा महार यांच्या पत्नी केशबाई यांचे बाळंतपण पांडुरंगांनीं कसें केलें, याचें रसभरित आख्यान; दि. ४ एप्रिल रोजीं दुपारीं ४। ते ७ वाजेपर्यंत ह. भ. प. आप्पाशास्त्री आठवले यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. पूर्वरंगांत त्यांनीं बुवाबाजीला भुलूं नका असें सांगितलें. आख्यान लाखा कोल्हाटी. हें आख्यान ह. भ. प. दासगणूंच्या आख्यानापैकीं फारच उत्तम व कारुण्यपूर्ण आहे. दि.५ एप्रिल रोजीं १०॥ पासून १२॥ पर्यंत रामजन्माचें आख्यान ह. भ प. आप्पाशास्त्री आठवले यांचें झालें. पूर्वरंगांत त्यांनीं श्रीरामजन्म आपण कां साजरा करावा, हें सांगितलें. श्रीरामप्रभू कांहीं दरवर्षी जन्मास येत नाहींत पण त्यांच्या चारित्र्यांतील कित्येक गुणांपैकीं एखाद्या गुणाचें तरी अल्पशः अनुकरण व्हावें, असा आपल्या हातून प्रयत्न व्हावा, येवढ्याकरितां दरवर्षी हा उत्सव साजरा करावयाचा असतो. लक्ष्मण वनवासास जावयास निघतात व मातुःश्रीची परवानगी मागतात. त्यावेळीं त्या त्यांना सांगतात :—

' रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम् । '

श्रीरामप्रभूंना पूज्य पित्याच्या ठिकाणीं मान, व सीतामाईमध्यें मला बघ व अरण्यामध्येंहि सुखानें रहा. केवढें मोठें मन आहे ! त्याचप्रमाणें श्रीमारुतिराय अशोकवनांत सीतामाईंना आणावयास गेले आहेत. त्या इतक्या अत्यंत कृश झालेल्या आहेत, कीं त्यांच्या हातांतील श्रीरामनाममुद्रा त्यांना बांगडीसारखी झाली होती. श्रीमारुतिराय त्यांना सांगत आहेत

कीं, 'आपण हो म्हणा, मी आपल्याला श्रीरामप्रभूंच्याकडे घेऊन जातों.' त्या माऊलीनें त्या गोष्टीस नकार दिला. कारण त्या म्हणाल्या कीं, मला रावणानें फसवून, फजिती करून येथें आणलें आहे. माझे श्रीरामराय ज्यावेळीं रावणाचा निःपात करून विजय मिळवितील त्याचवेळीं मानानें मी त्यांच्याबरोबर जाईन. अशी लपून तुझ्याबरोबर येणार नाहीं. व जरी मारुति म्हणजे सीतामाईंना पुत्रासारखा होता, व तो अगदीं पूर्ण ब्रह्मचारी होता तरीसुद्धां, त्याचा थोडावेळ कां होईना स्पर्श म्हणजे परपुरुषाचा स्पर्श मला नको आहे. केवढी विचारांची उदात्तता आहे. कां नाहीं अशा स्त्रिया पूज्य आदर्श म्हणून आमच्यापुढें रहाणार !

दि. ४ एप्रिल रोजीं सकाळीं ६ वाजतां चोपदारांच्या ललकारींत व मिरवणुकीनें श्रीसांईनाम संकीर्तनास सुरवात झाली. समाधिमंदिरांतून मिरवणूक—वीणा व पोथी यांची—निघून श्रीगुरु पादुकास्थान व तेथून श्रीद्वारकामाईत येऊन विसर्जन पावली. **सांईनाथगुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।** ह्या नामसंकीर्तनानें द्वारकामाई निनादून निघाली. श्रीसांईसच्चरित् पारायणासहि सुरवात, कै. गजानन महाराज गुप्ते यांचें परम शिष्य श्री. दादासाहेब आंबेडकर ५९१ बुधवार पेठ, पुणें यांनीं संस्थानास दिलेल्या श्रीसद्‌गुरु सांईमहाराजांच्या तैलछायाचित्रासमोर झाली. ह्या कार्यक्रमांत मुंबई कचेरींतील व शिरडी येथील कचेरींतील मंडळीचें त्याचप्रमाणें अनेक स्थानिक व इतर भक्तमंडळीचें मनःपूर्वक सहाय्य झालें. ह्या कार्यक्रमाला हल्लीं भक्तबंधु भगिनींचा व मातांचा चांगलाच पाठिंबा मिळावयास लागला आहे, ही एक आनंदाची गोष्ट आहे. मंगळवार दि. ५ ला सकाळीं ६ ला पुन्हां मिरवणुकीनें हा कार्यक्रम संपविण्यांत आला.

दि. ५ रोजीं रात्रौ कलाकारांच्या हजेऱ्या श्रींच्या समोर झाल्या, त्यांत विशेष उल्लेखनीय म्हणजे पुणें येथील श्री हनुमानसिंह ठाकोर यांच्या बालमित्र साईनाथ भजनी मंडळाचा कार्यक्रम, लोकप्रिय गायक जिजाबा, एका ७ वर्षाच्या मुल.चें स्वतंत्र तबलावादन, बडोद्याचे श्री. सय्यदभाई यांचें बाबांच्यावरचें कव्वाली गायन; व श्री. लहानू नागपुरे यांचें गायन व श्री. देवळणकर यांचे सनईवादन. पालखी, रथ व निशाणे यांच्याही मिरवणुका व्यवस्थित रीतीनें काढल्या गेल्या.

दि. ५ रोजीं रात्रौ संदलचाही कार्यक्रम झाला. उत्सवाच्या दिवसांत अभिषेक सामुदायिकच झाले. दि. ५ ला सकाळीं कावड्यांची मिरवणूक व त्या पाण्यानें श्रींचे समाधीला स्नान घालण्याचा कार्यक्रम चांगला झाला. ह्या कार्यक्रमांत शिरडीचे लहान थोर गांवकरी आनंदानें व उत्साहानें भाग घेतात.

या महोत्सवानिमित्त विविध प्रकारचे अनेक कार्यक्रम झाले. नामांकित पैहलवानांच्या प्रेक्षणीय कुस्त्या झाल्या. शोभेचें दारूकामही सोडण्यांत आलें होतें. या रामनवमी उत्सवांत एकंदरींत सुमारें पन्नास हजार साई भक्तांनीं भाग घेतला असाव

त्या सर्वांची रहाण्यासवरण्याची व भोजनाची जितकी म्हणून काळजी घेणें शक्य होतें तेवढी घेण्यांत आली होती. रहाण्यासाठीं व विश्रांतीसाठीं मोठमोठे मंडप घालून त्यांत सुमारें शंभर खोल्या पाडण्यांत आल्या होत्या. आल्या गेल्याचें आरोग्य संभाळणें ही एक महत्वाची बाब असते. स्वच्छता, संडास, पिण्यासाठी व स्नानासाठीं पाणी वगैरे सर्व आवश्यक गरजांकडे लक्ष पुरविण्यांत आलें होतें.

या सर्व कार्यांत स्थानिक मंडळीकडूनही भरपूर सहकार्य मिळालें हें साभार नमूद करणें जरूर आहे.

दि. ६ रोजीं सकाळीं साडे दहा ते साडेबारा वाजेपर्यंत ह. भ. प. अप्पाशास्त्री आठवले यांचें काल्याचें कीर्तन होऊन हा महोत्सव उत्साहभरांत समाप्त झाला.

—बाबांच्या बाळाचें बाळ

---

# श्रीसाईबाबाची खरी भक्ति

साईबाबा हे मानवतेचे—माणुसकीचे पुजारी होतें. एकमेकांवर प्रेम करावें, एकमेकांची सेवा करावी ही त्यांची शिकवण होती. समाधी घेईपर्यंत तेंच कार्य त्यांनीं अखंडितपणें केलें. तोच त्यांचा धर्म होता. तो आपण पालन केला पाहिजे. एकमेकां सहाय्य करूं। अवघे धरूं सुपंथ॥ हाच मार्ग आपण चोखाळला पाहिजे. दीनदुबळ्यांची, संकटग्रस्तांची सेवा व त्यांचें दुःख निवारण, हीच संतसेवा व देवसेवा होय. संतांचें नांव घेऊन आपणास पुण्य लागणार नाहीं. त्यांचें नांव व त्याचबरोबर त्यांचें काम—दीन दुबळ्यांची सेवा—आपण केलें तरच पुण्य पदरीं पडेल.

साईबाबांवर आपली श्रद्धा असावी व आहे; परंतु ती आंधळी श्रद्धा नसावी. त्यांच्यावर श्रद्धा ठेवणें म्हणजे;त्यांचें अनुकरण करणें; त्यांचीं तत्त्वें आचरणांत आणणें. सर्व मानव जातीशीं आपण बंधुभावानें वागलें पाहिजे. आपल्या कुटुंबांतील माणसांशीं आपण वागतों, त्यांची काळजी वाहतों, तशीच काळजी आपण सर्वांबद्दल वाहिली पाहिजे. 'श्रीसाई बाबाकी जय' असें म्हणून आपण त्यांचा जरूर जयजयकार करावा. परंतु त्यांनीं जो धर्म आचरणांत आणिला, त्याचा विसर आपणांस पडतां कामा नये. तो आचरणांत आणण्याची आपण पराकाष्ठा केली पाहिजे; तरच त्यांचा जयजयकार होणार आहे. त्या योगेंच त्यांची कृपा आपणांस संपादन करण्यांत येणार आहे.

श्रीसाईबाबांच्या नांवानें थोतांड माजविणारीं माणसेंहि आढळून येतात. त्यांच्यापासून आपण सावध राहिलें पाहिजे. भोळेपणा सोडून देऊन विचारानें वागलें पाहिजे; तरच आपणांस श्रीसाईबाबांची भक्ति केल्याचें श्रेय मिळणार आहे.

—संत तुकडोजी महाराज.

—:o:—

# संताच्या सहवासांत

*************************

## मांसान्न कीं वडे आणि सांभार

श्रीसद्गुरु गजानन महाराज ( नासिक ) शेताचा वसूल गोळा करण्याकरितां गेले असतां महाडास त्यांचा एकदां मुक्काम झाला. तेथें रा. रणदिवे नांवाचे एक मित्र होते. ते फार श्रद्धावान् होते. रोह्याच्या रा. वामनराव कुळकर्णी यांनी महाराजांची पूर्वीच ओळख करून दिली होती. रा. रणदिवे त्यावेळेस प्रांताचे शिरस्तेदार होते. ते त्यावेळीं फिरतीवर होते व त्यांचा मुक्काम महाडपासून तीन मैलांवर होता. त्यांना महाराज आल्याचें समजल्याबरोबर रात्रौ मुक्कामाला येण्याची त्यांना त्यांनीं विनंति केली. महाराजांचे रा. वामनराव मुथुरे नांवाचे दुसरे एक मित्र डॉक्टर होते. ते रामभक्त होते. महाराजांनीं त्यांना रा. रणदिव्यांचेकडे चलण्याची विनंति केली, तेव्हां डॉक्टर-साहेबांच्या बैलगाडींतूनच ते महाडजवळच्या गांधारी नदीला पूर आला होता तरी कँपांत सुखरूपपणें रात्रौ दहा वाजेपर्यंत पोंचले. कँपांत कांहीं ब्राह्मण व कांहीं कायस्थ प्रभु अशी दोन्ही जातींची मंडळी होती. जेवावयाची तयारी झाली. कायस्थ प्रभु लोकांना मांसान्न चालतें म्हणून त्यांचीं पानें वेगळीं मांडली होतीं. ‘ असल्या अन्नाची आम्हांस सवय नाहीं; आमचीं पानें शाकाहारी पंक्तींत मांडा ’ असें महाराज व डॉक्टरसाहेब यांनीं इतर मंडळींस विनविलें. ‘ आपणा कायस्थांस हें कांहीं अपरिचित नाहीं. आपण विनाकारण ढोंग करीत आहांत ’ असें म्हणून कांहीं जण महाराजांची थट्टा करूं लागले. ‘ आपला आग्रहच असेल तर माझें कांहींच म्हणणें नाहीं; मी आपण सांगाल त्या पंक्तींत भाग घेईन ’ असें म्हणून महाराज कायस्थांच्या पंक्तींत बसले. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपल्यापुढील मांसान्न असलेल्या पानाचा त्यांनीं ईश्वरास नैवेद्य दाखविला. तर काय आश्चर्य! त्या सर्व मांसान्नाचें वड्याच्या सांभारांत रूपांतर ताबडतोब झालें. सर्वजण चकित झाले. रा. रणदिवे हे फार श्रद्धावान् असून महाराज हे साधु असल्याचा त्यांचा विश्वास होता. त्यांनीं तें सांभार अलिबागला त्यांच्या घरीं प्रसाद म्हणून पाठविलें. आश्चर्याची गोष्ट हीच कीं, आठ दिवस तें सांभार जसास तसें न नासतां राहिलें होतें.

## अत्तरवाल्याचें गर्वहरण

ही गोष्ट धुळ्याला घडली. एके दिवशीं सकाळीं नवाचे सुमारास महाराज श्री. सासवडकर यांचे घरीं गेले. ते व श्री. सासवडकर बोलत बसले असतां कनोजहून आलेला एक अत्तरवाला तेथें आला. त्यानें शहरांतल्या श्रीमान् आणि मोठमोठ्या पैंडांना अत्तरें विकली होतीं. त्यांची एक यादी केली होती. ती यादी त्यानें श्री. सासवडकरांस दाखविली. आणि तो म्हणाला “ तुमचें नांव ऐकून मी येथें आलों आहें. दोन तीन तोळे अत्तर तुम्ही घेतलें पाहिजे. ” सासवडकर म्हणाले, “ मी कांहीं अत्तराचा शोकी नाहीं. ” ते त्याला जा म्हणून सांगणार होते, परंतु तसें न करितां त्यांनीं दोन तीन